## चित्रपट - संत तुकाराम

'संत तुकाराम' या जगप्रसिद्ध संतपटातला आठवले यांनी लिहिलेला, केशवराव भोळे यांनी संगीतबद्ध केलेला, विष्णुपंत पागनीस यांनी गायलेला आणि त्यांच्यावरच चित्रित झालेला 'आधी बीज एकले' हा अभंग संत साहित्याचे गाढे अभ्यासक हरिभक्तपरायण ल रा पांगारकर यांनी जेव्हां ‘पाहिला' तेव्हां तुकारामांचा एवढा चांगला अभंग गाथेच्या आपल्या वाचनातून कसा सुटला याचे त्यांना कमालीचे आश्चर्य वाटले आणि त्यांनी परत गाथा वाचली, पुन्हा पुन्हा पालथी घातली पण तो अभंग काही सापडेना ! जेव्हां त्यांना कळले की तो अभंग तुकारामांचा नसून शांतारामांचा आहे, ते "कवी तो आहे कसा आननी" हे पाहण्यासाठी प्रभात फिल्म कंपनी मध्ये आले. साहित्य सम्राट तात्यासाहेब केळकर यांचाही समज तसाच होता.

या चित्रपटातील गीतांचा गौरव लोकमान्य टिळकांच्या केसरी या वर्तमानपत्राने २६ मार्च १९३० च्या अंकात, आपली शिस्त मोडून, मुद्दाम केला. "पांडुरंगाच्या कृपेने शिवाजीमहाराज सुखरूप असल्याचे पाहून पागनीसांनी 'वानु किती रे सदया विठुराया, दीनवत्सला' या पदाच्या द्वारे झालेला आनंद इतक्या बहारीने व्यक्त केला आहे की त्याबद्दल पागनीसांचे अधिक अभिनंदन करावे की इतके नादमधुर व रसप्रचुर पद रचणारे श्री शांताराम आठवले यांचे करावे हेच कळेनासे होते --- श्री शांताराम आठवले यांनी केलेली पदेही रसपरीपोषक व नादमधुर अशीच आहेत. 'आधी बीज एकले' हे त्यांचे पद्य पोरासोरांच्याही तोंडी झाले आहे. या वरून त्या पदाची योग्यता कळून येईल. असे उदात्त, उपदेशपर बोलपट वारंवार पहावयास मिळतील तर बोलपटसृष्टीवरील आक्षेप आपोआपच गळून पडतील."

## चित्रपट - संत तुकाराम

### आधी बीज एकले

आधी बीज एकले
बीज अंकुरले, रोप वाढले
आधी बीज एकले.

एका बीजापोटी तरू कोटी
कोटी जन्म घेती सुमनेफळे
आधी बीज एकले.

व्यापुनी जगता तूही अनंता
बहुविध रूपे घेसी, घेसी
परी अंती ब्रह्म एकले.

## चित्रपट - संत तुकाराम

### निशिदिनी हरिचा ध्यास जिवाला

निशिदिनी हरिचा ध्यास जिवाला

व्याकुळ विरह करी हृदया

भुलवुनी झाली राधा भोळी

छळ हा दारुण का वनमाळी

मृदु मंजुळ तव ऐकव मुरली

प्रीतिसुधा वितरी सदया

## चित्रपट - संत तुकाराम

### वानु किती रे सदया विठुराया दीनवत्सला

वानु किती रे सदया विठुराया दीनवत्सला

दीनवत्सला धावुनि ब्रीदासी राखिले

अमृतचि हे वोळले, कृष्ण रुपडे देखियले

विश्व अवघेचि त्यात विरले, हे ध्यान सावळे